# जवाहर नवोदय विद्यालयात सायबर सुरक्षा विषयावर कार्यशाळा संपन्न

▪बाभुळगांव,दि.१९ (प्रतिनिधी) :

जवाहर नवोदय विद्यालय बाभुळगाव (जहांगीर) येथे सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्स कु. साक्षी शिरसाट आणि कु. वैष्णवी पाटील यांनी विद्यार्थ्यांना मोबाईल आणि इनरनेट च्या चुकीच्या वापरामुळे सायबर गुन्हे झपाट्याने कसे वाढत आहेत या विषयी माहिती सांगितली. मोबाईल चा अती वापर टाळावा, सतत मोबाईल गेम्स खेळल्या



मुळे कसे वाईट परिणाम होतात, व्हॉट्सप, इंस्टा, फेसबुक आणि फेक वेबसाइट्सच्या माध्यमातून कशी फसवणूक होते आणि या पासून आपण कसे सुरक्षित राहावे या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

मोबाईल वापरताना २ स्टेप व्हेरिफिकेशन करावे, सेक्युरीटी सर्टिफिकेटअसलेल्याच वेबसाईटला विझिट करावे, सोशल मेडीयाचा सुरक्षितपणे कसा वापर करावा याविषयीच्या सुरक्षा टिप्स विद्यार्थ्यांना सांगितल्या.कार्यशाळेत विद्यार्थांनी विविध प्रश्न विचारून उत्स्पूर्त सहभाग नोंदवला.यावेळी मोबाईल आणि इंटरनेट चा योग्य पद्धतीने करण्यासाठी विध्यार्थ्यांना शपथ देण्यात आली आणि सुरक्षा टिप्स असलेले माहितीपत्रक वाटप करण्यात आले.ही कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला चे प्राचार्य डॉ. जे. एम. साबू, समन्वयक डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली, 'क्विक हिल फाउंडेशन, पुणे' आणि महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई' यांच्या सहयोगाने आणि जे.एन.व्ही.चे प्राचार्य श्री आर.रवींद्र चंदनशिव, उपप्राचार्य श्रीमती कविता चव्हाण यांच्या परवानगीने आयोजित केली